
ISSN No. 2455-4928
मार्च २०१८
मासिक
साहित्य
चपराक
www.chaprak.com
▪ वर्ष : दहावे ▪ अंक : तिसरा ▪ पृष्ठे : ५२
मूल्य : ₹४०/-
संपादक : घनश्याम पाटील

एक परिपूर्ण मासिक

सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

Website :www.chaprak.com

चतुरस्त्र परखड रास्त कर्तव्यदक्ष

ISSN. No. 2455-4928

संस्थापक, संपादक : घनश्याम पाटील

| | | |
|---|---|---|
| सहसंपादक | : | माधव गिर |
| उपसंपादक | : | सौ. चंद्रलेखा बेलसरे |
| व्यवस्थापक | : | वसंतराव पाटील |
| सल्लागार | : | सुधीर गाडगीळ, ज्ञानेश्वर तापकीर, वैभव जोशी, विकास मुंदडा, |
| मुखपृष्ठ | : | संतोष घोंगडे |
| कार्यालयीन व्यवस्थापक | : | प्रमोद येवले |
| ऑनलाईन व्यवस्थापक | : | वैभव कुलकर्णी |
| अन्य सहकारी | : | मोरेश्वर ब्रह्मे, अरुण कमळापूरकर, निखील भोसले, अर्चना डावरे, विनोद श्रा. पंचभाई, सागर सुरवसे, सागर कळसाईत, सचिन सुंबे, चिन्मय साखरे |

संपादकीय कार्यालय
**'चपराक प्रकाशन'**
फ्लॅट क्र. २, सुवर्णमयी सह. गृहरचना संस्था, १४ वी गल्ली,
परमहंसनगर, वनाज कंपनी समोर, पौड रस्ता, कोथरूड,
पुणे ४११ ०३८ **दूरध्वनी - ०२० - २५३८४९०९**
**भ्रमणध्वनी** ७०५७२ ९२०९२, ७७२००१०३५४
वेबसाईट: www.chaprak.com इ-मेल: info@chaprak.com

## अंतरंग


- प्राप्त काळ हा विशाल भूधर! - **घनश्याम पाटील/५**
- शिक्षण... नोकऱ्या... बेरोजगारी! - **संजय सोनवणी/८**
- आरोग्याची गुरूकिल्ली - **ज्योति शिरोडकर/१८**
- ''माणसाला माणसाशी जोडण्याचे बळ दे!'' - **डॉ. कैलास दौंड/२०**
- स्त्रीजाणिवांचा समर्थ आविष्कार *'सुरवंट'* - **ऋषिकेश देशमुख/२४**
- मस्त मस्त बालकविता - **सुभाषचंद्र वैष्णव/२७**
- आनंदी... आनंदाचा झरा - **मनिषा कुलकर्णी-आष्टीकर/२८**
- प्रार्थना - **विश्वास वसेकर/३०**
- सुख-दुःख - **सुनील परचुरे/३१**
- 'कलश' अमर शेखांचा, प्रस्तावना अत्रेंची! - **डॉ. माधव पोतदार/३४**
- बेफिकिरी नाही बरी - **विनोद श्रा. पंचभाई/३९**
- नगर आठवण-साठवण - **सदानंद भणगे /४०**
- सुजाण पालकत्व - **ॲड. शैलजा मोळक/४५**
- मंगल आणि निर्भया - **प्रा. सुरेश भिलकोटकर/४८**


### कविता


- **भाऊ तोरसेकर,** मुंबई /१४
- **पांडुरंग पुठ्ठेवाड,** नांदेड /२९
- **रामचंद्र किल्लेदार,** ग्वाल्हेर /३८
- **चंदना सोमाणी,** पुणे /३८
- **महादेव कोरे,** पुणे /४७
- **डॉ. विशाल इंगोले,** लोणार (सरोवर) /४७
- **प्रसाद कुलकर्णी,** इचलकरंजी /४९
- **केदार शेवाळकर,** नांदेड/४९


### वर्गणी

(सर्व विशेषांकासह)

एक वर्षासाठी **₹ ५००**
तीन वर्षासाठी **₹ १५००**
पाच वर्षासाठी **₹ २५००**

**आपणास** www.chaprak.com **या संकेतस्थळावरून ऑनलाईन वर्गणी भरता येईल.**

# मंगल आणि निर्भया



■ प्रा. सुरेश भिलकोटकर
नाशिक, चलभाष–९४२२२९२६७०

**१६ डिसेंबर २०१२** रोजी दिल्लीत चालत्या बसमध्ये एका तरुणीवर अनन्वित अत्याचार झाले. या पार्श्वभूमिवर पंचवीस वर्षापूर्वी घडलेला हा प्रसंग आठवतो. तो असा.

नाशिक जिल्ह्यातील एका तालुक्याच्या गावापासून वीस–पंचवीस किलोमीटरवर एक छोटेसे खेडेगाव आहे. सुमारे अडीच–तीन हजार लोकवस्तीच्या या गावात आजही माध्यमिक शाळा नाही. गावातून माध्यमिक शाळा चार किलोमीटरवर आहे. गावात आजही महामंडळाची बस येत नाही. काही खाजगी वाहने वाढल्याने अलीकडची परिस्थिती ठीक आहे. पंचवीस वर्षापूर्वी परिस्थिती अत्यंत बिकट होती. ज्यांना कोणाला माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असेल अशी मुले–मुली दररोज आठ किलोमीटर पायी येत–जात असत. पायी जाताना शेतातल्या पाऊलवाटेने आणि उभ्या पिकातून जावे लागत असे. अशा सुनसान रस्त्याने जाताना मुलांनाही भीती वाटत असे. मुलींची परिस्थिती तर विचारूच नका पण त्याही परिस्थितीत दररोज आठ किलोमीटरची पायपीट करून शिक्षण घेणाऱ्या मुली या खेडेगावात होत्या. अशा मुली अनेकदा दोघी–तिघी मिळून शिक्षण घेण्यासाठी ये–जा करीत असत.



अर्थातच काही दूषित आणि विकृत नजरा या मुलींकडे असत, हे वेगळे सांगायला नको. ज्या एकाच्या शेतातून या मुली शाळेतून पाऊलवाटेने जात असत, त्यातील एकाने मुलींवर पाळत ठेवली. एक दिवस असा उगवला की त्या तीनपैकी दोन मुली काही कारणाने शाळेत जाऊ शकल्या नाहीत. एकटी मंगल नावाची मुलगी शाळेत गेलेली त्या नराधमाने पाहिली. शाळा सुटल्यानंतर तो नेमक्या ठिकाणी लपून बसला. डोक्यापेक्षाही अधिक वाढलेल्या पिकांमधून पाऊलवाटेने मंगल जात होती. नेमक्या वेळी पाऊल वाटेवर येत अचानक त्या बारा–तेरा वर्षाच्या मुलीचा हात त्याने धरला. काय होतंय हे कळत नाही, तोवर तिच्या हातावरील त्याची पकड घट्ट झाली. ती घाबरली.

तीन मुलांचा बाप असलेल्या त्या चाळीशीतील राक्षसाच्या डोळ्यातील बीभत्स भावना आणि विस्फारणारी नजर तिला समजली पण क्षणार्धात ती सावरली. गावापासून दूरवर असल्याने तिचा आवाज कोणापर्यंत जाणार नव्हता. त्याच्या तोंडावर मारायला तिच्या पायात भरभक्कम चप्पल नव्हती. तसे करूनही तिची सुटका होणे, तिला अवघड दिसले. ती क्षणात सावध झाली. त्याच्या डोळ्यातील हेतूकडे दुर्लक्ष करीत मोठ्या धैर्याने तिने त्यातून निश्चित मार्ग काढावयाचे ठरविले.

''काका, हायी तुमनं वावर शे का?'' हृदयात धडधड वाढत असताना चेहऱ्यावर स्मित आणत मंगल म्हणाली.

''मंग, तुले माहीत नही का?'' तो.

''पण काका तुमी कधी दखायनात नही माले येता जाता?'' मंगल.

''मी तुले जरी दखायनु नही तरी तू माले दर्रोज दखावसं'' असे म्हणत त्याने मंगलला जवळ ओढले.

ती आधीच सावध झालेली होती. काका म्हटल्यावरही काही फरक पडत नसलेल्या आपल्याच गावातील तथाकथित प्रतिष्ठित धेंडाशी तिचा सामना होता. ती म्हणाली,

''तुम्हा मनात काय शे, ते माले चांगलंच समजेल शे.'' तिने

आवाजात थोडा लाडिकभाव आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. त्याने समोरच्याची कळी खुलली. तशी ती आर्जवी स्वरात आपली करंगळी त्याला दाखवत म्हणाली,

''दोन मिन्टात जायी ईऊ का?''

विवेक हरविलेला काका घाईतच होता. त्याने लगेच होकारार्थी मान हलविली. त्याक्षणी त्याच्या हाती आपले दप्तर देत, लघुशंकेच्या निमित्ताने ती बाजूच्या पिकात शिरली. दप्तर हातात घेऊन काका तिची वाट पाहू लागला. दोन-तीन मिनिटे झाल्यावरही मंगल कशी येत नाही, म्हणून हातात तिचे दप्तर घेऊन वाट पाहणारा काका जरा अधिकच अधीर झाला. हातातील दप्तरासह तो तिला शोधू लागला. नेमकी ती कोठे आहे, हे झाडावर चढून तो पहायला लागला. तोवर मंगलने धूम ठोकली होती. ती जवळपास एक किलोमीटर अंतर पार करून गावाजवळ पोहचली होती. घरी जाऊन तिने वडिलांना सारा प्रकार सांगितला. क्षणार्धात दोघे-चौघे शेताकडे धावले. पुरावा काकाच्या हातातच होता!

मंगल मूळची त्या गावातील नव्हती. दूरवरच्या गावावरून येथे नोकरीनिमित्त आलेल्या व येथे वास्तव्यास असलेल्या प्राथमिक शिक्षकाची ती मुलगी होती. शिक्षक सुस्वभावी व शांत स्वभावाचा होता. ही बाब लक्षात घेऊनच या विकृत धेंडाने धाडस केले होते; पण मुलगी चतुर निघाली. शिक्षक पिता शांत स्वभावाचा होता पण आपल्या हक्कांची त्याला पुरेपूर जाणीव होती. त्याने कायद्याचा हिसका दाखवायला सुरुवात केली तसे लब्धप्रतिष्ठांनी सपशेल लोटांगण घातले. गुन्हेगार व त्याच्या घरादारातील सर्वांनीच नाके घासली. काही तडजोडी झाल्या. तथाकथित काकाच्या या कृत्यामुळे त्याची व त्याच्या घराण्याची प्रतिष्ठा गेली ती कायमचीच! मंगल मात्र आज निर्भयपणे नि ताठ मानेने जगत आहे!

या प्रसंगात मंगलने त्याला चप्पल मारली असती तर...? जोरात आरडाओरडा केला असता तर...? तर कदाचित त्याने बळाचा वापर केला असता... कदाचित तिला इजा केली असती... जखमी केले असते... इतरही अनर्थ ओढवले असते... म्हणजेच नक्कीच विपरित घडले असते...

आपण पुरुषही वेळी-अवेळी बाहेर पडल्यावर एखादे कुत्रे व जनावर अंगावर आले तर त्याचा थेट सामना करणे टाळतो. वाट वाकडी करतो किंवा समोरच्या प्राण्याला चुचकारत वेळ निभावून नेतो. पुरुषसुद्धा रात्री-बेरात्री बाहेर व जंगलात बाहेर पडताना चारदा विचार करतात. असा प्रसंग आलाच तर शांतपणे आणि विवेकाने सामना करणे शहाणपणाचे ठरते. एकटे बाहेर पडणाऱ्या मुलींकडून अशी अपेक्षा असतेच असते. मंगलने बिकट प्रसंगातून हुशारीने मार्ग काढला. दिल्लीतील निर्भयापुढे संकट मोठे होते. तिला मंगलसारखे असे काही करता आले असते तर...? ■

## फणा

मनात वादळ उठले होते, जगास दिसलो भरकटताना
मात्र अखेरी शांत जाहलो, मिठीत तुझिया गुरफटताना


एका मागे एक पाहिली स्वप्ने जेव्हा धुरकटताना
श्वासामागे जात राहिला जीवच तेव्हा फरफटताना

नख जखमेला लावत असता कधीच नसते विसरायाचे
तीव्र वेदना होतच असते नख कुठलेही उचकटताना

ह्या जामिनीशी माझे नाते, कुठली मस्ती, कुठला ताठा?
फणा काढतो तोही असतो जन्मभरीचा सरपटताना

माझी धगधग शांत कराया कुठले चंदन? कुठले पाणी?
ताठ कण्याने मी जाताना दिसला काळच लटपटताना

■ **प्रसाद कुलकर्णी**
समाजवादी प्रबोधिनी
५३६/१८, इंड. इस्टेट, इचलकरंजी,
जि. कोल्हापूर ४१६११५
चलभाष - ९८५०८३०२९०



## राधा कृष्ण

राधा राधा
ध्यानी मनी
राधा कृष्ण
एकरूपीणी

राधा म्हणजे कृष्ण
कृष्ण म्हणजे राधा
भक्तीचा हा धागा
पाहिजे हाती धरला

भक्ती अशी असावी
ठेच कृष्णा लागता
कळ जिवा लागावी
यातना जिरावी श्री पाहता.

■ **केदार शेवाळकर,** नांदेड
चलभाष - ९०७५०९७४८३